

क्रांतियुग
औदयोगिक क्रांती
अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द
फ्रेंच राज्यक्रांती

# फ्रेंच राज्यक्रांती

- क्रांतीच्या उंबरठ्यावरील फ्रान्स
- समाज रचना
- फ्रान्समधील करपध्दती
- फ्रान्समधील न्याय व्यवस्था
- विचारवंत

- परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न
- एस्टेटस जनरलची सभा व टेनिस कोर्ट शपथ
- बॅस्टिलचा पाडाव
- राष्ट्रीय सभेचे कार्य
- मानवी हक्काचा जाहिरनामा

- मेरी अॅन्टाईट
- स्त्रियांचा मोर्चा
- फ्रान्सची राज्यघटना
- क्रांतीचा परिणाम

विदयार्थी मित्र हो,

- आपणा सर्वांना माहित आहे.
- अमेरिकन क्रांती किंवा अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द का घडले? कसे घडले ? या सर्वांची माहिती आपल्याला आहे.
- अमेरिकेत अनेक राजकीय, सामाजिक व आर्थिक बदल घडून आले.
- अमेरिकेतील १३ वसाहती इंग्लंडच्या हातून निसटल्या हा ब्रिटिश साम्राज्याला बसलेला मोठा धक्का होता.
- इंग्लंडला वसाहतींबाबत सामंजस्य व उदारमतवादी धोरण स्वीकारावे लागले.

- अमेरिकेत स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतल्याने फ्रान्सची आर्थिक स्थिती डबघाईला आली.
- अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेल्या फ्रेंच सैनिकांनी मायदेशात परतल्यावर लोकशाही विचारांचा प्रसार व प्रचार करुन फ्रेंच क्रांतीची पार्श्वभूमी तयार केली.

- आपणा सर्वांना युरोपच्या नकाशात  फ्रान्स हा देश कोठे आहे हे माहित आहे का?
- फ्रान्सचा नकाशा.



- या नकाशात पाहिल्या प्रमाणे १८ व्या शतकात फ्रान्स हा युरोपातील वैचारिक व आर्थिक दृष्टया प्रगत राष्ट्र होते.
- या काळात फ्रान्समध्ये बुरबॉ घराण्याचे राज्य होते.
- या घराण्यातील राजा १४ वा लुईची कारकीर्द होती.
- त्याच्या काळात फ्रान्स वैभवाच्या शिखरावर होते.



चौदावा लुई

- फ्रान्सची राजधानी पॅरीस ही युरोपियन संस्कृतीचे केंद्रस्थान होते.
- फ्रेंच विचारवंत व त्यांचे तत्त्वज्ञान यांचा प्रभाव साऱ्या युरोपभर पसरला होता.
- पण १४व्या लुईच्या मृत्यूनंतर तेथील राजकीय परिस्थितीत बदल होत गेले आणि १७८९ साली फ्रान्स मध्ये प्रचंड उलथापालथ झाली.
- तेथे सामान्य जनतेने उठाव केला.
- यालाच इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती असे म्हणतात.

- हि जी फ्रेंच राज्यक्रांती झाली, ती फ्रान्स किंवा युरोपपुर्ती मर्यादित राहिली नाही.
- त्याचा प्रसार पूर्ण जगभर झाला.
- मानव जातीच्या इतिहासातील ही अतिशय महत्त्व पूर्ण घटना आहे.
- ही झाली फ्रान्सबद्दल थोडक्यात माहिती पण फ्रेंच राज्यक्रांतीचा विचार करत असताना आपल्याला तेथील सामाजिक व राजकीय गोष्टींचा विचार करावा लागतो, आणि तो आपण पुढील प्रमाणे करणार आहोत –

- फ्रेंच राज्यक्रांती म्हणजे काय़? आणि ती का घडली असेल बर?
- याचा आपण कधी विचार केला आहे का? आणि नसेल केला तर ती आता आपण शिकूया.
- ही जी फ्रेंच क्रांती झाली ती नेमकी कशामुळे झाली याचा आता आपण विचार करुया.
- हा विचार करत असताना आपल्याला तेथील सामाजिक, राजकीय व आर्थिक या सर्व गोष्टींचा विचार
 करुया.

- १८ व्या शतकात फ्रान्सची सामाजिक व राजकीय परिस्थिती फारशी चांगली नव्हती.
- १४व्या लुईच्या मृत्यू नंतर इ.स. १७८९ मध्ये फ्रान्सच्या लोकसंख्येत, व्यापारात व प्रादेशिक विस्तारात वाढ झाली होती.
- तरी ही समाज जीवनात मोठी विषमता होती.
- असमाधानकारक राजकीय परिस्थिती हे फ्रेंच राज्यक्रांतीचे कारण असले तरी, सामाजिक, आर्थिक व वैचारिक हे घटक ही फार महत्त्वाचे आहे.
- ते पुढील प्रमाणे –

# समाजरचना

## पहिला वर्ग

- वरिष्ठ धर्मगुरु

## दुसरा वर्ग

- अमीर – उमराव

## तिसरा वर्ग

- व्यापारी
- वकील
- डॉक्टर
- शिक्षक
- शेतकरी
- कामकरी
- भूदास

- तिसऱ्या वर्गात मोठया प्रमाणात शेतऱ्यांची संख्या होती.
- त्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय होती.
- शेतकऱ्यांना उमरावांच्या शेतावर वेठबिगार म्हणून देखील काम करावे लागत असे.
- त्यांना अनेक प्रकारचे कर दयावे लागत असे.

  कामगारांचा वर्ग हा सर्वात कनिष्ठ मानला जात असे आणि कराचा सर्व बोजा त्यांच्यावरच असे.

**उदा –**

- टाईथ कर हा धर्मगुरुंना
- क्राऊन टॅक्स हा राजाला राजमुकुट कर
- टॅली हा मालमत्तेवरील कर
- गॅबल हा मिठावरील कर

इत्यादी स्वरुपाचे कर जनतेला भरावे लागत असे.

## ❖ फ्रान्समधील करपध्दती –

- पराकोटीची आर्थिक विषमता हे फ्रान्समधील समाजजीवनाचे वैशिष्ट्य होते.
- धर्मगुरु, सरदार यांच्याकडे प्रचंड संपत्ती असून हा वर्ग कर मुक्त होता.
- सामान्य जनतेवर कराचा बोजा होता.
- कर पध्दतीमुळे सामान्य जनतेची दैनावस्था झाली होती.
- या कर पध्दतीमुळे सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण झाली.
- कार्लाइल या इतिहासकारच्या मते –

  फ्रान्समध्ये $\frac{९}{१०}$ लोक भुकेने मरतात.

## ❖ फ्रान्समधील न्यायव्यवस्था –

- फ्रान्समधील न्यायालयीन व्यवस्था ही असमानता जोपासणारी होती.
- प्रत्येक वर्गासाठी न्यायदानाची वेगळी तत्त्वे होती.
- फ्रान्समध्ये एकाच वेळेस ३६० कायदेपध्दती वापरल्या जात होत्या.
- न्यायालयीन क्षेत्रात गोंधळाचे वातावरण होते.
- विषम न्यायव्यवस्थेविषयी सामान्य जनतेत असंतोष होता.
- इ.स. १७८९ मध्ये तिसऱ्या वर्गाचा प्रचंड उद्रेक झाला.

- प्रत्येकाला वेगळा न्याय होता.
- त्यामुळे सामान्य जनतेत मोठया प्रमाणावर असंतोष पसरला होता.
- फ्रान्समधील राज्यक्रांती ही सामान्य जनतेने घडून आणलेली क्रांती होती.
- हा वर्ग एकसंध नव्हता.
- फ्रान्सच्या बौध्दिक, सांस्कृतिक वैभवाला तसेच धान्य उत्पादनाला याच वर्गाने चालना दिली.
- तरी या वर्गावरच करांचा सर्व बोजा असल्यामुळे या वर्गाची स्थिती दयनीय होती.
- या विषमतेविरुध्द समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य फ्रेंच विचारवंतांनी केले.

# Exercises

- तत्कालीन फ्रान्समधील कर पध्दती जाणून घेवून सध्याच्या कर पध्दतीशी तुलना करा.

- खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. १४ व्या लुईची राजवट थोडक्यात लिहा.
२. फ्रान्समधील न्यायव्यवस्थेचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

# Assessment

- योग्य जोड्या लावा.

| | |
|---|---|
| अ गट | ब गट |
| १. १४ वा लुई | १. गॅबल कर |
| २. फ्रान्सची राजधानी | २. ३६० |
| ३. धर्मगुरु | ३. बुरबॉ घराणे |
| ४. कायदेपध्दती | ४. टाईथ कर |
| | ५. पॅरिस |

1- 3 , 2- 5 , 3- 4 , 4- 2